# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
E-Mail : jtdirrom@gmail.com Web : www.jdteromumbai.com

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-३ /गुण.यादी तपासणी/२०१२/ 2999
दिनांक : 13 OCT 2013

प्रति,
संचालक/प्राचार्य
शासकीय, शासकीय अनुदानीत व
सर्व खाजगी विनाअनुदानित
पदवी व पदव्युत्तर पदवी,पदविकोत्तर/पदवित्तर पदवीका
अभ्यासक्रमाच्या संस्था
(सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे)

विषय :- विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरीता नॉन क्रिमीलेअर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविल्याबाबत

संदर्भ :- १.शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग क्रमांक सीबीसी-१० /२००८/ प्र क्र ६९७ / विजाभज- १ दिनांक २४.६.२०१३
२.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१३/१०६१ दि. ३१.०८.२०१३

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्या असून आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यातील विमुक्त जाती,इतर मागासप्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट याकरिता **नॉन क्रिमीलीअर साठी असलेली उत्पन्न मर्यादा ही रुपये ४.५० लाखावरुन ६.०० लाख एवढी वाढविलेली आहे.**

सदर शासन निर्णय दिनांक १६.५.२०१३ पासून अंमलात आला असून त्यानुसार जे उमेदवार व्यावसायीक अभ्यासक्रमास नॉन क्रिमी लेअर अभावी खुल्या प्रवर्गातून प्रवेशित झालेले आहेत अशा विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकडे सुधारीत उत्पन्न मर्यादेमुळे नॉन क्रिमी लेअर प्राप्त झाल्यास आणि जात वैधता प्रमाणपत्र असल्यास असे उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेल्या शुल्क प्रतिपुर्तीसाठी पात्र ठरतील सदर बाब संस्थेतील विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणण्यासाठी वरील नमुद शासन निर्णयाची प्रत सूचना फलकावर (नोटीस बोर्ड) प्रदर्शित करण्यात यावी.

सहपत्र: संदर्भीय पत्राची प्रती.

(जी.बी. धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय मुंबई.

प्रत :- संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांना माहितीकरिता.

Z:\Admission 12-13\Engg. Dip\Admition for 2013-2014.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: dtedesk2a@gmail.com Internet: http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक: 2अ/एडीएम/2013/७०६९

दिनांक : 31 AUG 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट याकरिता नॉन क्रिमीलेअर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविल्याबाबत....

संदर्भ : शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सीबीसी-१०/२००८/ प्र क्र ६९७/ विजाभज-१, दिनांक २४.६.२०१३

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्या असून आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट याकरिता नॉन क्रिमीलेअर साठी असलेली उत्पन्न मर्यादा ही रुपये ४.५० लाखावरून ६.०० लाख एवढी वाढविलेली आहे.

सदर शासन निर्णय दिनांक १६.५.२०१३ पासून अंमलात आला असून त्यानुसार जे उमेदवार व्यावसायिक अभ्यासक्रमास नॉन क्रिमी लेअर अभावी खुल्या प्रवर्गातून प्रवेशित झालेले आहेत अशा विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांकडे सुधारीत उत्पन्न मर्यादेमुळे नॉन क्रिमी लेअर प्राप्त झाल्यास आणि जात वैधता प्रमाणपत्र असल्यास असे उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेल्या शुल्क प्रतिपूर्तीसाठी पात्र ठरतील. सदर बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात यावे. तसेच सदर बाब संस्थेतील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी नोटीसबोर्डवर प्रदर्शित करण्याच्याही सूचना देण्यात याव्यात.

(डॉ.सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी अग्रेषित

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई-४१.
आवक क्रमांक : 8082
दिनांक 17 SEP 2013

D:\Budage\2013-14\Gen Correspondence\non creamy layer circular.docx

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती / गट या करीता नॉन क्रिमीलेअर साठी असलेली उत्पन्न मर्यादा वाढविणे बाबत.

# महाराष्ट्र शासन

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

### शासन निर्णय क्रमांकः सीबीसी-१०/२००८/प्रक्र. ६९७/विजाभज-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक: २४ जून, २०१३

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः समाजकल्याण, सांस्कृतिक व क्रीडा विभाग क्रमांक: सीबीसी-१०/२००८/ प्र.क्र.६९७/ मावक-५ दि. १३ जानेवारी २००९

२) मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, भारत सरकार यांचे ऑफीस मेमोरेन्डम क्रमांक ३६०३३/१/२०१३ इएसटी (आरईएस),दिनांक २७/०५/२०१३

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनूसुचित जमाती,निरधिसुचीत जमाती, (वि.जा) भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) अन्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग मधील उन्नत व प्रगत व्यक्ती/ गट वगळून आरक्षणाचे फायदे लागू करण्यात आलेले आहेत. उच्च व उन्नत व्यक्ती/गटासाठी राज्यशासनाने शासन निर्णय दिनांक १३ जानेवारी, २००९ अन्वये कौटुंबिक उत्पन्न मर्यादा, केंद्रशासनाच्या धर्तीवर रु.४.५० लाख एवढी निश्चित केलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयाअन्वये केंद्रशासनाकडून यापुढे ज्या-ज्या वेळी उत्पन्न मर्यादेत वाढ केली जाईल, तीच उत्पन्न मर्यादा यापुढे महाराष्ट्र राज्यातील आरक्षण सोयी सवलतीकरीता उन्नत व प्रगत गट/व्यक्ती याकरिता लागू राहील असा निर्णय ही घेण्यात आलेला आहे. केंद्रशासनाने इतर मागासप्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी उत्पन्न मर्यादा रु.४.५० लक्ष वरुन रु.६.०० लक्ष एवढी वाढ केलेली आहे. सदर उत्पन्न मर्यादेत केलेली वाढ राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासप्रवर्ग यामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

१) राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग यामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट याकरिता नॉन क्रिमीलेअरसाठी असलेली उत्पन्न मर्यादा ही रु. ४.५० लक्ष वरुन रु.६.०० लक्ष इतकी वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. ज्यांचे उत्पन्न मागील सलग तीन आर्थिक वर्षामध्ये प्रत्येक वर्षी रु.६.०० लाखापेक्षा जास्त आहे अशांना आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

२. तसेच, केंद्रशासनाने इतर मागासप्रवर्गामधील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट वगळून आरक्षणाचे फायदे देण्यासाठी त्यांचेकडील दिनांक २७/०५/२०१३ च्या ऑफीस मेमोरेन्डम नुसार उत्पन्न मर्यादेत वाढ करुन ती रु.६.०० लाख वार्षिक करण्यात आलेली आहे (सदर ऑफीस मेमोरेन्डम ची प्रत केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रीव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, भारत सरकार च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे). केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आरक्षण व सेवा विषयक लाभासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्राशी संबंधित जी इतर मागासवर्गीयांची यादी निश्चित केलेली आहे त्यांना रु.६.०० लाख एवढी वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

३. सदर आदेश हे दि. १६/०५/२०१३ पासून अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०६२४१५३२२९१२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Pandurang Wadte

Digitally signed by Kiran Pandurang Wadte
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Pandurang Wadte
Date: 2013.06.27 15:22:54 +05'30'

(कि.पां.वडते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री सा.न्या यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री सा.न्या यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई